**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम,२००५ मधील तरतूदी अन्वये नदी-खोरे अभिकरणासाठी विशेष निमंत्रित (उद्योग) म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मजनिप्रा २०१४/(६०/१४)/जसं(आस्था),**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारिख : १८ ऑगस्ट २०१६.

<u>वाचा</u>-

१) शासन निर्णय क्रमांक : नदिजो-२००७/(१७७/०७)/जसंअ, दि. १३/०३/२००८.
२) शासन निर्णय क्रमांक : नदिजो-२०११/(८/११)/जसं(आस्था), दि. १०/०५/२०११.
३) शासन निर्णय क्रमांक : नदिजो-२०११/(८/११)/जसं(आस्था), दि. ०१/१०/२०११.
४) शासन निर्णय क्रमांक : मजनिप्रा २०१४/(६०/१४)/जसं(आस्था), दि. ११/०९/२०१४.

<u>प्रस्तावना</u>-

महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्याची सुनिश्चिती करण्याकरीता कृषी विषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१८ राजपत्रात अधिसूचित करण्यात आला आहे.या अधिनियमातील कलम -४(१) (घ) मध्ये पुढील तरतूद करण्यात आलेली आहे.

“प्राधिकरणाला धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यास सहाय्य करण्याकरिता प्रत्येक नदी-खोरे अभिकरणाच्या क्षेत्रातून एक याप्रमाणे विहित केल्यानुसार पाच विशेष निमंत्रित जे अभियांत्रिकी, शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, वित्तव्यवस्था किंवा व्यवस्थापन याचेशी संबंधित समस्यांचे पुरेसे ज्ञान, अनुभव असलेले किंवा त्या संबंधातील क्षमता शाबीत केली असेल असे असतील.” सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक- १८ च्या कलम २(प) नुसार नदी-खोरे अभिकरण याचा अर्थ नदी खो-यामध्ये कार्यरत असलेल्या पाच पाटबंधारे विकास महामंडळापैकी कोणतेही एक असा आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील ५ नदी-खोरे अभिकरणामधून विशेष निमंत्रितांची नियुक्ती उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र. १ नुसार यापुर्वी करण्यात आलेली होती. शासन निर्णय दि. ०१/१०/२०११ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या विशेष निमंत्रितांचा कालावधी दि. ३०/०९/२०१४ रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे नवीन विशेष निमंत्रितांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तद्नंतर संदर्भीय शासन निर्णय क्र. ४ दि. ११/०९/२०१४ नुसार श्री. ए. के. डी. जाधव यांची विशेष निमंत्रित (अर्थशास्त्र ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**शासन निर्णय-**

प्रत्येक नदी-खोरे अभिकरणांमधून एक अशा एकूण ५ विशेष निमंत्रितांना महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर विशेष निमंत्रित नियुक्त करणे अभिप्रेत आहे. त्याअनुषंगाने प्राधिकरणास धोरणात्मक बाबींवर सहाय्य करणेसाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महांडळ, औरंगाबाद या अभिकरणाच्या क्षेत्रातून श्री. राम भोगले यांची विशेष निमंत्रित (उद्योग) म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर विशेष निमंत्रितांचा कालावधी दि. १८.०८.२०१६ पासून तीन वर्षांचा म्हणजे दि. १७.०८.२०१९ पर्यंत असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०८१८१५४८१३४२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod Govindrao Mandade

Digitally signed by Pramod Govindrao Mandade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Superintending Engineer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pramod Govindrao Mandade
Date: 2016.08.18 15:47:16 +05'30'

**( प्र.गो.मांदाडे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मंत्री,जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री,जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३) मा.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) मा.सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक,जलसंपदा, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
११) सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१२) श्री. राम भोगले, उद्योजक, निर्लेप उद्योग, औरंगाबाद.
१३) जसं(आस्था) कार्यासन संग्रहार्थ.

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील तरतूदी अन्वये प्राधिकरणाला सहाय्य करण्यासाठी विशेष निमंत्रितांची नेमणूक करण्याबाबत .....**

# महाराष्ट्र शासन

**जलसंपदा विभाग**

**शासन निर्णय क्र. मजनिप्रा-२०१४/प्र.क्र.६०/१४/जसं(आस्था)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ जून, २०१८

<u>वाचा:</u>
१) शासन निर्णय क्रमांक: नदिजो-२००७/(१७७/०७)जसंअ, दि.१३/०३/२००८.
२) शासन निर्णय क्रमांक: नदिजो-२०११/(८/११)जसं(आस्था), दि.१०/०५/२०११.
३) शासन निर्णय क्रमांक: नदिजो-२०११/(८/११)जसं(आस्था), दि.०१/१०/२०११.
४) शासन निर्णय क्रमांक: मजनिप्रा-२०१४/(६०/१४)जसं(आस्था), दि.११/०९/२०१४
५) शासन निर्णय क्रमांक: मजनिप्रा-२०१४/(६०/१४)/जसं(आस्था), दि.१८/०८/२०१६.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र राज्यामधील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्याची सुनिश्चिती करण्याकरिता कृषी विषयक, औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (सन २००५ चा अधिनियम क्रमांक १८) राजपत्रात अधिसूचित करण्यात आला आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) मधील कलम ४ (१) (च) मध्ये पुढील तरतूद करण्यात आली आहे.

“प्राधिकरणाला सहाय्य करण्यासाठी, ज्यांच्याकडे जलसंपदा, अभियांत्रिकी, कृषि, पारिस्थितीकी व पर्यावरण, पेयजल, उद्योग, कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, वित्त किंवा व्यवस्थापन यांच्याशी संबंधित समस्या हाताळण्याचे पुरेसे ज्ञान, अनुभव असेल किंवा ज्यांनी त्यासंबंधातील क्षमता शाबित केलेली असेल असे, प्रत्येक नदी खोरे प्राधिकरणाच्या क्षेत्रातून एक याप्रमाणे, विहित केल्यानुसार पाच विशेष निमंत्रित असतील: परंतु, किमान एक विशेष निमंत्रित ही, महिला असेल: परंतु आणखी असे की, कोणतेही दोन विशेष निमंत्रित हे एकाच क्षेत्रातील किंवा क्षेत्रगटातील असणार नाहीत.”

सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम २ (प) नुसार "नदी-खोरे अभिकरण" याचा अर्थ, नदी खोऱ्यांमध्ये कार्यरत असलेल्या पाच पाटबंधारे विकास महामंडळांपैकी कोणतेही एक असा आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील ५ नदी-खोरे प्राधिकरणाच्या क्षेत्रातून प्रत्येकी एक याप्रमाणे अभिकरणामधून विशेष निमंत्रितांची नियुक्ती उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्र.१ ते ५ अन्वये यापूर्वी करण्यात आली होती.

शासन निर्णय दि.१८/०८/२०१६ अन्वये प्राधिकरणावर गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या अभिकरणाच्या क्षेत्रातून श्री.राम भोगले यांची विशेष निमंत्रित (उद्योग) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर निमंत्रिताचा कालावधी दि.१८/०८/२०१६ पासून तीन वर्षांचा म्हणजे दि.१७/०८/२०१९ पर्यंत आहे.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र.१, २, ३ व ४ अन्वये यापूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या विशेष निमंत्रितांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे विशेष निमंत्रित (उद्योग) वगळून ४ विशेष निमंत्रितांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.-

**शासन निर्णय :-**

प्रत्येक नदी खोरे अभिकरणांमधून एक असे एकूण ५ विशेष निमंत्रित महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर नियुक्त करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद वगळून उर्वरित ४ महामंडळातून प्रत्येकी एक याप्रमाणे पुढील प्रमाणे तक्त्यात दर्शविल्यानुसार महामंडळनिहाय तज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नदी खोरे अभिकरण | विशेष निमंत्रितांची नांवे | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव | डॉ. स्वाती संवत्सर (महिला) | कृषी |
| २ | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे. | श्री.भा. च. कुंजीर | अभियांत्रिकी |
| ३ | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर. | श्री.जे. पी. डांगे | अर्थशास्त्र |
| ४ | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे. | श्री.सुनिल व्ही. वामन | जलसंपदा |

सदर निमंत्रितांचा कालावधी नियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा म्हणजे दि.२६/०६/२०२१ पर्यंत असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०६२८१२०३५१९८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2018.06.28 12:09:33 +05'30'

( र. रा. शुक्ला )
**उप सचिव (जसं) महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्ष नेते, विधान सभा व विधान परिषद,
७. मा.प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, विधान सभा व विधान परिषद
८. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२.सचिव, (प्रकल्प व समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.सचिव, जलसंधारण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४.सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई
१५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
१६. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
१७. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
१८. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
१९. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
२०. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२१.उप सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२२.सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. डॉ. स्वाती संवत्सर, डी ब्लॉक गर्ल्स हॉस्टेल, एम. जे. कॉलेज कॅम्पस, जिल्ह्लापेठ, जळगांव,
२४. श्री.भा. च. कुंजीर, फ्लॅट नं.२२, पाचवा मजला, अनिस अनोस हौसिंग सोसायटी, रैं. परांजपे गल्ली, आपटे रोड शेजारी १२१९, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००१.
२५. श्री.जे. पी. डांगे, २१ यशोधन, दिनशा वॉच्छा रोड, सी.सी.आय. समोर, चर्चगेट, मुंबई-२०.
२६. श्री.सुनिल व्ही. वामन, १५, मोतीराम प्लाझा, आयडियल कॉलनी, कोथरुड, पुणे-४११०३८.
२७.जसं (आस्था) कार्यासन, संग्रहार्थ.